अभिरुची

मराठी मंडळ सॅक्रामेंटोचे त्रैमासिक मुखपत्र.

- प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व मंडळ सहमत असतेच असे नाही.
- लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलांचे आणि व्याकरणीय दरुस्तीचे अंतिम अधिकार संपादक व मंडळाकडे राहतील.

२०१६ अंक #4

या अंकात

संपादकीय	अजित नातू
अध्यक्षीय	विक्रम बोबडे
Celebrating Life	निखिल चांदेकर
२०१६ उर्वरित कार्यक्रम कॅलेंडर	कार्यकारिणी
करावे तसे भरावे	उल्हास हरी जोशी
स्मृती	अरविंद साने
कविता - आहे का तुझी तयारी?	अजित नातू
नेहेमीची सदरे, शब्दकोडे	अजित नातू
कार्यक्रमाचे फोटो साईट लिंक्स	कार्यकारिणी
March for the Dream, MLK, Jan 16th	**IAS Flyer**

संपादकीय

संपादक - अजित नातू

नमस्कार मंडळी

म्हणता म्हणता वर्ष संपले. मराठी मंडळाने खूप चांगले कार्यक्रम दिले व विशेष म्हणजे कार्यकारीणीने सुंदर कामगिरी या वर्षी केली याबद्दल २०१६ कार्यकारीणीचे हार्दिक अभिनंदन व कौतुकाची पावती.

हे ‘अभिरुची’ मासिक, संपादक व लेखक या नात्याने या वर्षी सादर करताना खूपच समाधान व आनंद झाला. नुसत्या २०१६ वर्षातच नाही तर पहिल्यापासूनच हा मी उपक्रम चालवला याचेही समाधान मला मिळाले. जणू मराठी भाषेची सेवाच माझ्या हातून झाली असे मी समजतो. मराठी वाचन व लिखाण आपल्या मराठी मंडळीनीच जिवंत ठेवली पाहिजे नाहीतर इंग्रजीच्या प्रसाराखाली आपली मायबोली संपून जाईल, अजून १०० वर्षांनी हे होईल, याची चाहूल व भीती मला वाटते. म्हणूनच हा अंक या परदेशात चालू ठेवायचा इतके वर्ष मी प्रयत्न केला, खारीचा भाग उचलला. तुमच्या मुलांना मराठी शिकवा, बोलायला शिकवा हे तर मी सतत सांगत आलो आहे, त्याची पुनः विनंती.

कार्य पसरले पाहिजे, चांगले कार्यतर नक्कीच. मराठी मंडळ आज नावारूपाला आले याचा मला खूप आनंद होत आहे अन कोठेतरी आपण केलेले श्रम वाया गेले नाही, आपण लावलेले रोप वृक्षात रुपांतरीत झाले याचा खूप आनंद नक्की होत आहे. मंडळासाठी खूप लोकांनी खूपच श्रम उचलले, अगदी २००५ च्या त्या पहिल्या दिवसापासून. तो दिवस माझ्या चांगलाच लक्षात आहे. त्या सगळ्यांना मी मनापासून धन्यवाद ह्या माध्यमातून देतो. जसे मंडळाबद्दल तसेच ह्या मासिकासाठीपण यापुढे इतरांनी पुढाकार घेतला तर नवीन विचारप्रवाह, नवीन वारे वाहतील व हे मासिक जास्त चांगले, जास्त नावारूपाला येईल असे मला वाटते. म्हणून आता पुढील वर्षी मासिकासाठी मी संपादक नसणार याचा निर्णय मी घेतला आहे. तो पूर्ण विचाराअंती व पूर्ण समाधानाने, परीपुर्तीच्या आनंदाने घेतलेला निर्णय आहे. तेव्हा हा माझा असा शेवटचा अंक गोड मानून घ्या हि विनंती. तसेच सगळ्या लेखकांचे, मदत करणारयान्चे मनापासून आभार!

या अंकात निखिल चांदेकरने नेहेमीप्रमाणे खूप उपयोगी असा लेख लिहिला आहे. मनाची शक्ती किती महत्वाची हे पटवून दिले आहे. एक गोष्ट ह्या लेखनातून माझ्या मनावर ठसली ती म्हणजे झोपताना मन

शांत असेल तर दुसऱ्या दिवशीपण आपण शांत वृतीने जागे होतो व पुढील दिवस चांगला जातो. वा! किती छान विचार आहे. मनाने जीवनाचे सेलेब्रशन करायला शिका मग आपोआप जगायची मजा येईल. निखिल लेख दिल्याबद्दल धन्यवाद.

आपल्या सभासद, अमिता नातू, यांच्या वडिलांनी म्हणजे उल्हास जोशी यांनी अनेक प्रकारचे लेख लिहिले आहेत. त्यातील एक लेख त्यांनी आपल्याला उपलब्ध करून दिला त्याबद्दल त्याचे मनापासून आभार. त्या लेखात दोन भाग विरुद्ध परिस्थितीचे वर्णन करतात त्यात एक संदेश आहे. माणुसकीमुळे कसे चांगले होते व उद्दाम वागण्याचे रुपांतर तोटा होण्यात होते हे उदाहरणावरून खूप सुंदररित्या वर्णन केले आहे.

श्री. अरविंद साने यांनी (मोनिका सानेचे सासरे) ह्या मासिकाला नेहेमीच लेखांद्वारे मदत केली आहे. यावेळीहि त्यांनी 'स्मृती' हा लेख लिहिला आहे. उलटून गेलेल्या आयुष्याच्या अनुभवांचे वर्णन केले आहे व त्या आठवणींमुळे आयुष्य पूर्ण उपभोगल्याचे समाधान मिळते हेच आठवणींची पाने उलटताना प्रत्येक माणसाला अनुभवाला येईल बर का!

अजित नातू यांनी "आहे का तुझी तयारी" हि त्यांची कविता सादर केली आहे. विहिरीतील बेडकांची एकमेकांना खाली खेचून फक्त विहिरीतच जीवनाचे सार्थक असते अशी वृत्ती असते. त्यावरून कुपमंडूक (कूप म्हणजे विहीर, मंडूक म्हणजे बेडूक) शब्द वापरात आला. समाजातील काही मंडळीपण ह्याच वृत्तीने जगतात. या अशा लोकांनी 'कुपमंडूक' वृत्ती टाळून प्रयत्न करून रहाटगाडग्यातून बाहेर यावे असे अजितला वाटते. अजित ह्या काव्यातून हेच सांगत आहे प्रवाहाविरुद्ध पोहायची तयारी दाखवा, comfort zone च्या बाहेर या तरच प्रगती होऊ शकते.

बाकीची नेहेमीची सदरे, शब्दकोडे आहेतच, वाचून विरंगुळा मिळावा हाच त्यामागचा हेतू. तसेच IAS तर्फे १६ जानेवारीला MLK parade आहे त्यात सहभागी वा, त्याबद्दलची माहिती दिली आहे.

काही चुका झाल्या असतील तर क्षमस्व, या मासिकाबद्दल आपले अभिप्राय नक्की कळवावेत हि विनंती.

मनापासून धन्यवाद!

अजित नातू
(संपादक, अभिरुची त्रैमासिक, mmsac)
ajit_natu@hotmail.com

PNG JEWELLERS WISHES YOU
HAPPY DIWALI
THIS DIWALI GET
25% OFF* on entire Diamond Collection
20% OFF* on Silver Collection
upto 10% OFF* on selected Gold Jewelry
Get a FREE Silver Coin on your Jewelry Purchase.
PNG JEWELLERS
PARAMPARA ACHCHAI KI
SINCE 1832
PNG Jewelers INC
820E El Camino Real, Sunnyvale, Ca 94087. Ph.: (408) 245-6764 | 3760 Mowry Ave., Fremont, Ca 94538. Ph.: (510) 791-3357
www.pngjewelers.com | PNGJewelersUSA

अध्यक्षीय - विक्रम बोबडे

नमस्कार मंडळी,

सर्वप्रथम आपणासर्वांना माझ्याकडून आणि आमच्या कार्यकारिणीतील इतर सर्व सदस्यांकडून नवीन वर्ष्याच्या हार्दिक शुभेच्छा ! हे वर्ष आपणासर्वांना आनंदाचे आणी भरभराटीचे जावो.

मंडळी, पाहता-पाहता आमच्या कार्यकारिणीचा एक वर्षयाचा कार्यकाळ पूर्ण होण्याची वेळ आली आहे. येत्या १५ जानेवारीला होणार संक्रांतीचा आणी वार्षिक सर्वसाधारण सभेचा कार्यक्रम ह्या कार्यकारिणीचा शेवटचा कार्यक्रम असेल. ह्याच कार्यक्रमात २०१७-१८ ची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात येईल आणी १ फेब्रुवारी पासून ती नवीन कार्यकारणी आपला पदभार स्वीकारेल. आमच्या कार्यकारिणी ने गेल्या १२ महिन्यात केलेल्या कार्याची माहिती आम्ही १५ तारखेच्या कार्यक्रमात सादर करणार आहोत त्यामुळे त्या विषयी इथे फार काही जास्त लिहीत नाही. एवढं मात्र जरूर नमूद करावंसं वाटतं कि ह्या वर्षी मंडळाने अत्यंत चांगले दर्जेदार कार्यक्रम दिलेत आणि तुम्ही लोकांनी सुद्धा त्यांना भरपूर प्रतिसाद दिला. हे वर्ष नक्कीच सर्वांच्या स्मरणांत राहील यात शंका नाही. आमच्या कार्यकारिणीने अतिशय मनापासून आणि प्रचंड मेहेनत करून प्रत्येक कार्यक्रमाचा दर्जा उत्तम ठेवण्याचा प्रयत्न केला. अर्थात हे करताना कुठे काही छोट्या चुका झाल्या असतील, कदाचित तुमच्यापैकी कुणाची कधी गैरसोय झाली असेल किंवा कोणी नकळत दुखावलं गेलं असेल तर सर्व कार्यकारिणीच्या वतीने मी व्यक्तिशः तुमची माफी मागतो. मला सांगायला अतिशय अभिमान वाटतो कि ह्या कार्यकारिणीतील सर्व सदस्यांनी (श्रीकांत आणि प्रिया जोशी, कौस्तुभ उपाध्ये, पूनम जाधव) मंडळाच्या कामासाठी स्वतःला अक्षरशः वाहून घेतलं होतं. स्वप्नवत वाटावी अश्या टीम मध्ये काम करायला मिळावं हे मी माझं भाग्यच मानतो. कौटुंबिक आणिक व्यावसायिक जबाबदाऱ्या सांभाळून मराठी मंडळासाठी इतके कष्ट करणं

खरोखर कौतुकास्पद आहे. मुख्य कार्यकारिणी व्यतिरिक्त इतर कार्यकारिणीतील मंडळी आणि मंडळाच्या स्वयंसेवकांचे सुद्धा कौतुक करावे तेवढे कमी आहे. त्यांच्या मदतीशिवाय आम्हाला यशस्वी होताच आलं नसतं. ह्या सर्व मंडळींचे मी आमच्या मुख्य कार्यकारिणी तर्फे मनापासून आभार मानतो. तसेच मंडळाला आर्थिक हातभार लावणाऱ्या प्रयोजकांचे आणि डोनेशन देणाऱ्या दानशूर व्यक्तींचे सुद्धा मनापासून आभार. ह्या सर्व मंडळींचा पाठिंबा नवीन कार्यकारिणीला सुद्धा असाच मिळेल अशी आशा करतो. याबरोबरच, आपल्या सर्वांच्या नवनवीन कल्पना, नवनवीन कलाविष्कार, सहकार्य आणि आपण सर्वानी घेतलेली मेहनत यामुळेच आपल्या मंडळाने एक नवी उंची गाठली आहे. मराठी मंडळ सॅक्रामेंटो आपल्या मनाच्या गाभाऱ्यात अढळ स्थान मिळवून आहे. येथे राहूनही आपण मराठी भाषा, मराठी बाणा जपत आहात म्हणूनच नवीन समिती सुद्धा मंडळाचा उत्तरोत्तर विकास करण्याचा तसेच आपल्या सर्वांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा मनापासून प्रयत्न करेल अशी मला खात्री आहे.

व्यक्तिशः मला मंडळात काम कारण हे फार अनुभव समृद्ध करणारं होतं. बऱ्याच लोकांच्या ओळख्या झाल्या, अध्यक्ष म्हणून येणाऱ्या जबाबदारीचा ताण अनुभवता आला आणि मुख्य म्हणजे संगीत, नाटक, साहित्य इं. मनापासून आवडणाऱ्या कार्यक्रमांच्या आयोजनाचा भाग होता आलं. माझी आपणासर्वांना मनापासून विनंती आहे कि आपणही भविष्यात मंडळाच्या कार्यकारिणीत काम करण्यासाठी पुढे यावं. आपल्या अनुभवातही नक्की भर पडेल अशी मला खात्री आहे. मंडळाच्या कार्याची हि पालखी प्रत्येकानी एकदा तरी आपल्या खांद्यावर घेतली पाहिजे ! मराठी मंडळ सॅक्रामेंटो बालवयातील व शालेयवयातील पिढीवर सांस्कृतिक कार्यक्रमातून अनेक संस्कार आणि मराठी संस्कृतीचे दर्शन सादर करण्याची संधी देते. सॅक्रामेंटो परिसरात येणाऱ्या नवीन मराठी कुटुंबांना सहकार्य आणि व्यासपीठ देऊन त्यांना मंडळाच्या विशाल कुटुंबात सामील करून घेते. सामाजिक कार्य करणाऱ्या संघटनांना सढळ हस्ते मदत करते. आपल्या सर्व सभासदांना एकत्रित आणण्यासाठी विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करते जेणेकरून बहुसंख्य मराठी कुटुंबे एकमेकांना प्रेमाने व विश्वासाने सहकार्य करू शकतात. पण हे सर्व करण्यासाठी आपण प्रत्येकाने आपापला वाटा उचलला पाहिजे.

मंडळी, अभिरुची ह्या वर्षीचा हा चौथा आणि शेवटचा अंक आपल्या पर्यंत पोहोचवतांना मला खूप आनंद होत आहे. कृपया आपण तो संपूर्ण वाचवा हि अपेक्षा. आपल्या काही सूचना असतील तर त्या नक्कीच आमच्यापर्यंत पोहोचवा. अभिरुचीच्या माध्यमातून तुमची मराठी लिहिण्याची (किंवा

टाइप करण्याची) आणि वाचण्याची सवय खंडित होऊ नये तसेच आपल्या मंडळातील इतर घडामोडींची माहिती मिळावी हाच उद्देश.

गेल्या वर्षभरात अभिरुचीच्या संपादकपदाची जबाबदारी अजित नातू ह्यांनी अतिशय समर्थपणे पार पडली. अतिशय मेहेनत घेऊन त्यांनी प्रत्येक अंक उत्कृष्ट आणि वेळेत तयार केला. ह्या अंकासाठीसुद्धा अजितने भरपूर मेहेनत घेतली आहे. त्यानां आणि ज्यांनी ह्या अंकासाठी साहित्य पाठवलं आहे त्यांना मी खूप-खूप धन्यवाद देतो. आपण गेली वर्षभर अभिरुची मासिकाचा आस्वाद घेतला असेल अशी आशा करतो !

पुन्हा एकदा आपल्या सर्वांना नवीन वर्ष्याच्या हार्दिक शुभेच्छा !!!

आपला नम्र
विक्रम बोबडे, अध्यक्ष मराठी मंडळ साक्रामेंटो २०१६-१७

Century 21
SELECT REAL ESTATE
6300 Florin Rd
Sacramento, CA 95823
Office: 916-394-8705
Direct: 916-695-7703
eFax: 916-394-8805
lpokle@c21selectgroup.com
laxmikant.pokle.c21selectgroup.com
MLS
Laxmikant Pokle
Realtor®
CaBRE #01986685
Each office is independently owned and operated

mithai4all
Your Shop Away From Home
Celebrate Diwali with Mithai4all
Send mithai gifts to your
parents, friends & relatives in India.
Order mithai online & get it home delivered
We also deliver to US, UK, Canada,
Singapore, Australia and 10+ countries

लेख: Celebrating Life लेखक: निखिल चांदेकर

It is a holiday season and the word celebration quickly brings thoughts of food, music, parties, socialization and excitement. This is all good when done in moderation however let's to look at celebration from another perspective. Celebration is most often associated with gifts so let's think of celebrating the gift of life force which is flowing inside us. This is the most subtle energy flowing in our system and when we are able to divert it towards creative purpose then every moment becomes festive. In this article we discuss following aspects to explore another dimension of celebration:

1. Creating an environment conducive to explore subtle energy forces.
2. Tools and means to develop creative abilities and finding a creative activity of your personal choice.
3. Directing the energies towards the chosen creative activity.

The goal is to feel fulfillment and festive and it is only possible when our energies get a creative expression. I invite you to this adventure where we let our energies be consumed by our creative endeavours.

Energy & Environment

The human system is composed of a gross body and it is supported within by other layers of subtle systems. Those who do

not believe in subtle systems or layers, let's take example of mind. Term mind is used synonymously with brain but mind is a subtle entity within us whereas brain is a physical organ which gives physical expression to the mind. As body cannot sustain without the support of mind, similarly mind cannot sustain without underlying supporting layers which are more finer and subtle than the mind. Normally we consider food as the only source of energy. The energy we get from food is a gross level of energy which support our gross body but subtle layers in our body requires subtle energies. Thus to support the subtle layers, we have different energy mechanism and yogis call it Chakras. Like a dynamo which rotates to generate electricity similarly Chakras in our system rotate to transmute and enable the slow of subtle energy to support subtle layers including our mind. During sleep we restore the life force or subtle energy, exercising our body activates the energy and during day to day work we consume the energy. Just eating more does not result in more energy in our body, the physical energy must be supported by the subtle life force.

As death approaches the subtle energy system ceases to be in synch with grosser body and thus gross organ system starts collapsing. On the other hand to lead a lively, healthy and energetic life we should enable the subtle energy/life force to flow seamlessly.

The subtle layers do not have a shape, color or any magnitude or dimensions and thus it can only be felt and experienced when we make our mind very light and subtle. To achieve the goal of making

our mind light, our environment must be light, peaceful and joyful.

Firstly, we start with family environment. It is hard to not talk about kids when we talk about family. It is critically significant that we have cordial and friendly relationship with kids. To make the family environment light, it is important that we at least spend 30-40 minutes playing with kids. This play should not be competitive and does not include spending time with media and gadgets. It is playing for the sake of playing and no strings attached to it. This playful time must be interactive rather than kids playing on video game and parent is sitting with him watching messages on WhatsApp. This will help to develop a friendly rapport with kids. These days parents talk to kids when they want to deliver a lecture or assigning them some work and kids also talk to them when he or she needs a toy or money. The simple step explained above will put an end to this need based relationships. The more joyful environment created outside will be conducive to explore more joy inside.

Secondly, we need to evaluate how we end our day. The day starts the night before. The pattern in which we end our day determines the pattern of our next day. Most people are juggling with gadgets, facebook app and/or television while they are about to go to bed and then they wake up with similar thoughts. If you end your day with noisy mind then you will wake up with a noisy one. It is during sleep you can restore the most of your life force but since your mind is usually busy unconsciously with the chaos it results in

blocking optimum flow of the subtle energy and then you notice that you wake up tired. The food we eat gives energy but it needs to be backed by the life force which is restored during sleep. Don't believe my words, try not sleeping for 1 or 2 days and see if a shot of multivitamin or a healthy shake would work!

It is highly recommended that one should go to bed 15-20 minutes before retiring to sleep. Read/discuss a verse from Gita or read a paragraph from Power of Now book or spend prayerful time or listen to peaceful soothing music. There are specific frequencies of music which will activate your right brain creative capabilities. Dr.ShiChida, a Japanese educator has extensively worked on right brain education. He is the founder & father of ShiChida method used to develop the right hemisphere of mind. Right side of the brain gives physical expression to intuition, motivation, holistic thoughts, creativity, sensitivity etc. There is recommended music which is induced with specific frequencies of drum beats and helps to activate creative centers of the right brain. I highly recommend downloading free app named as Brighter Mind and playing the soothing music just before you go to bed. An additional free application which would help you to relax is Heartfulness app. This application will help you relax each part of your system including mind and finally draws your attention towards heart. Alternately, type, "Heartfulness Relaxation" on youtube and listen to the soothing technique. You may also start your day with practicing Heartfulness relaxation technique which only asks for 5 minutes of your time.

So far we covered how we can get energised and preparing our mind for creative pursuits. Let's now focus on how to find the creative activity of our choice. This activity which is suggested should not have any commercial utility i.e. not performing for getting anything in return. The activity must be something you are passionate about like painting, gardening, singing, nature photography etc. The question which is commonly asked is, how to find our activity we are passionate about. The simple answer is that any activity in which you forget time.

Take example of famous painter Vincent van Gogh. He used to paint just for painting, there was no desire to achieve fame, status or material benefits. It is said that one buyer was given money to persuade him to buy Van Gogh painting. The buyer went to Van Gogh and picked up an ugly painting. As he was about to pay money, Van Gogh refused to accept. The surprised buyer asked Van Gogh, "Why do you paint if you don't accept money" ? What do you get by painting? Van Gogh gently replied, " I already got what I wanted while I was painting".

Why are we here talking about creative activity? The energy needs direction otherwise it may take unwanted turn towards destruction. Adolf Hitler was said to possess enormous energy and he wanted to go to an art school but unfortunately he was denied admission. This incidence in his life is said to be the turning point where the enormous energy he possessed started moving towards dark side. When you feel lively and energetic, it's a gift and it is something

you do not want to give to a social party or a television or mobile phone. Let the energy be expressed towards a creative act of your choice and then you will see that in life you are feeling the joy and fulfillment. Now you find a meaning and purpose in your life and every moment becomes a celebration. You will start noticing that you are thriving with better health, feeling good about yourself and striking an emotional equanimity. In the end when time to depart this world you would not regret wasting any time but rather you would bid farewell in a festive mood.

धन्यवाद, निखिल

KIFS Kotwal Insurance & Financial Services

People don't plan to fail, They just fail to plan

When it comes to happy retirement, key is to plan well.

Dear Friend,

Just Half an Hour with Me Can HELP you:

- Plan for your children's college education
- Generate a **tax free** income from retirement till age 100
- Roll over your orphan IRAs and 401 Ks into meaningful, secure investment for guaranteed retirement income.
- Select a right insurance policy to cover your **mortgage** fully in case of death
- Reevaluate your existing insurance policy free of cost and if necessary suggest a better policy that will give you life coverage and completely tax free retirement income

In short, help you with planning all aspects of your financial life. Please call

Ray Kotwal, MBA Finance

Life Insurance and Planning Specialist

Insurance License No. OH12645

Remember KIFS for all your financial needs

Kotwal Insurance & Financial Solutions

www.raykotwal.biz raykotwal@hotmail.com



या वर्षातील आत्तापर्यंतच्या कार्यक्रमाना सभासदांचा भरगोस पाठींबा लाभला, त्याबद्दल मनापासून धन्यवाद. तसाच, किंबहुना त्याहूनही जास्त उपस्थिती वर्षाच्या शेवटच्या कार्यक्रमाला लाभेल हि इच्छा. त्या दिवशी २०१७ची नवीन कार्यकारिणी निवडली जाईल. २०१६च्या कार्यकारिणीने सुंदर काम करून छानच कार्यक्रम सादर केले त्याबद्दल कार्यकारिणीचे व मदतीचा हातभार लावणार्यांचे कौतुक, आभार, व धन्यवाद!

लेख: करावे तसे भरावे

लेखक: उल्हास हरी जोशी, (अमिता नातूचे वडील)

मायकेल एक हुषार पण गरीब मोटार मेकॅनिक होता. तो एका गॅरेजमध्ये कामाला होता. पण ते गॅरेज बंद पडले आणि मायकेलवर बेकारिची कुऱ्हाड कोसळली. त्याने लगेच दुसरी नोकरी शोधायला सुरवात केली पण बाजारात मंदी असल्यामूळे त्याला दुसरी नोकरी मिळत नव्हती. त्याने अनेक ठिकाणी अर्ज केले पण 'अप्लाय अप्लाय बट नो रिप्लाय' अशी त्याची अवस्था होती.

शेवटी त्याच्या प्रयत्नाला यश आले. एका मोठ्या व नावाजलेल्या कंपनीकडून त्याला इंटरव्हुसाठी बोलावणे आले. इंटरव्हुला वेळेवर हजर रहावे, उशीर केल्यास विचार केला जाणार नाही अशी तंबी पण देण्यात आली.

मोठ्या उत्साहाने मायकेल इंटरव्हु देण्यासाठी स्वच्छ, इस्त्रीचे कपडे घालून निघाला. त्याच्याकडे एक मोडकी सायकल हेच एकमेव वाहन होते. कंपनी बरीच दूर होती. मायकल सयकलवरून निघाला. रस्त्यात त्याला एक मोटार बंद पडलेली दिसली. एक वृद्ध ग्रृहस्थ ती मोटार चालू करण्याचा प्रयत्न करत होते पण त्यांना काही ते जमत नव्हते. त्यामूळे ते फार त्रासलेले होते. लोकांना मदतीसाठी हाका मारत होते पण धावपळीची वेळ असल्यामूळे कोणी थांबायला तयार होत नव्हते.

मायकलला त्या आजोबांची दया आली असावी. त्याने सायकल थांबवली व काय झाले असे त्या आजोबांना विचारले. 'गाडी अचानक बंद पडली, सुरू होत नाही' आजोबा म्हणाले. 'मी मोटार मेकॅनिक आहे. मी तुमची गाडी बघू का?' मायकेलने विचारले. 'जरूर' असे म्हणुन आजोबांनी गाडीची चावी मायकेलकडे दिली व ते खाली उतरले. गायकेलने गाडीची तपासणी केली व गाडीत काय फॉल्ट आहे हे लगेच त्याच्या लक्षात आले.

'मी तुमची गाडी ठीक करू शकतो पण आत्ता माझ्याकडे वेळ नाही.' मायकेलने सांगीतले. 'मी आत्ता इंटरव्हु देण्यासाठी चाललो आहे. मी जर तेथे वेळेवर पोचलो नाही तर माझा चान्स जाईल.'

'तुला कुठे इंटरव्हुला जायचे आहे?' आजोबांनी विचारले. मायकेलने कंपनीचे नाव सांगीतले.

'तु जर माझी गाडी रिपेअर केलीस तर मी तुला माझ्या गाडीतून इंटरव्हुला सोडेन. तसेच माझ्यामूळे उशीर झाला असे आत येऊन सांगेन.' आजोबा म्हणाले.

'ठीक आहे!' मायकेलने आजोबांवर विश्वास ठेवला. त्यांची गाडी रिपेअर केली. तिथेच बाजुला सायकल ठेवली व आजोबांच्या गाडीतून इंटरव्हु होता त्या ठिकाणी पोचला. त्याने त्याचा अर्ज दिला. पण त्याने बघीतले की तेथे भरपूर गर्दी आहे. अनेक जण आलेले आहेत. त्यामूळे आपल्याला चान्स मिळेल की नाही

याची मायकेलला शंका वाटू लागली. अर्ज नेणाऱ्या माणसाने त्याला 'तुम्हाला थांबायला सांगीतले आहे, तुम्ही जाऊ नका!' असा निरोप सांगीतल्यामूळे मायकेलने थांबायचे ठरवले.

इंटरव्हुला सुरवात झाली. एक एक उमेदवार आत जात होता व बाहेर येत होता. असे करता करता आख्खा दिवस संपला. संध्याकाळची वेळ सुरू झाली. अजुन मायकेलला बोलावणे येत नव्हते. तो तर पार कंटाळून गेला होता. आपल्याला काही ही नोकरी मिळत नाही असे त्याला प्रकर्षाने वाटू लागले होते. शेवटी सगळे कँडिडेट्स संपले व मायकलला बोलावणे आहे. मायकल इंटरव्हुच्या खोलीत गेला. समोर सहा माणसे बसली होती. मधल्या उंच पाठीच्या खुर्चीवर एक वृद्ध गृहस्थ बसले होते. ते त्या कंपनीचे सीईओ होते. मायकलने त्यांचेकडे पाहीले आणि त्याला धक्काच बसला. ज्या आजोबांना त्याने मदत केली होती तेच समोर बसले होते.

'मी तुझे कौशल्य बघीतले आहे. त्यामूळे तु उत्तम मेकॅनिक आहेस हे मी तेव्हाच ओळखले होते. पण तुझ्यातली माणुसकी बघून मी जास्त प्रभावीत झालो. तु माझ्याच कंपनीत इंटरव्हुला येतो आहेस हे कळल्यावर मी तिथेच तुझी निवड केली. पण तुला बराच वेळ थांबावे लागले कारण इथे आलेल्या बाकिच्या कँडिटेसचा इंटरव्हु घेणे आवश्यक होते. अभिनंदन! उद्यापासून कामावर हजर हो!' ते आजोबा म्हणाले.

मायकलच्या डोळ्यातून कृतज्ञतेचे दोन अश्रु ओघळले.

जॉन एक ॲग्रेसिव्ह मार्केटींग मॅनेजर होता. तो फक्त त्याच्या कामातच नव्हे तर एरवी सुद्धा ॲग्रेसिव्हच वागायचा. एका रविवारी तो मॉलमध्ये खरेदीसाठी म्हणून गेला. मॉलमध्ये प्रचंड गर्दी होती. कार पार्किंग फुल होते. गाडी पार्क करायला कुठे जागा मिळते का हे पहाण्यासाठी त्याने गाडी स्टार्ट केली. तोच समोरच्या पार्कींग लॉटमधून एकजण त्याची गाडी मागे घेत असल्याचे त्याला दिसले. तेथेच एक म्हातारबुवा आपल्या गाडीत बसून ती कार बाहेर पडण्याची वाट बघत होते. कारण त्यांना त्या ठिकाणी गाडी पार्क करायची होती. कारण त्या ठिकाणी गाडी पार्क करायचा हक्क त्यांचा होता. तेवढ्यात जॉनने मोठ्या स्मार्टपणाने आपली गाडी घुसवली, पार्क केली, आणि गाडीतून बाहेर पडून विजयी मुद्रेने त्या म्हातारबुवांकडे बघत मॉलकडे चालू लागला. बिचारे म्हातारबुवा थोडेसे वैतागले व दुसरीकडे पार्किंग शोधण्यासाठी निघून गेले.

त्यानंतरचा दिवस सोमवारचा होता. जॉनच्या दृष्टीने हा दिवस अत्यंत महत्वाचा होता. त्या दिवशी एका मोठ्या आणि प्रतिष्ठीत कंपनीबरोबर एक भले मोठे कॉन्ट्रॅक्ट 'साईन' होणार होते. यासाठी जॉनने ढोर मेहेनत केली होती. हे कॉन्ट्रॅक्ट म्हणजे जॉनच्या शिरपेचातील मानाचा तुरा ठरणार होता. त्याचे प्रमोशन पक्के होणार होते. हे कॉन्ट्रॅक्ट आपल्यालाच मिळणार याची जॉनला खात्रीच होती.

कॉन्ट्रॅक्टवर सही करण्यासाठी जॉन आपल्या क्लायंटच्या ऑफिसमध्ये पोचला. कंपनीचे सिईओ कॉनट्रॅक्टवर सही करणार होते. त्याआधी एक फॉर्म्यालिटी म्हणून त्या सीईओंना भेटणे व त्यांच्याशी 'शेक हॅन्ड' करणे एवढीच गोष्ट बाकी राहिली होती.

जॉन मोठ्या उत्साहाने सीईओ साहेबांना भेटायला गेला. त्याला आत बोलावणे आले म्हणून दो मोठ्या उत्साहाने आत गेला. त्याने समोर नजर टाकली आणि तो चांगलाच हादरला. ज्या म्हातारबुवांचा पार्किंक लॉट त्याने हिरावून घेतला होता तेच म्हातारबुवा समोर बसले होते. म्हातारबुवांनी पण त्याला लगेच ओळखले. त्यांनी कॉन्ट्रॅक्टवर सही न करताच ते पेपर्स परत पाठवून दिले.

जॉनला ते कॉन्ट्रॅक्ट मिळाले नाही. बिचारा जॉन डोक्याला हात लाऊन बसला.

थोडक्यात- जसे करावे तसे भरावे.

(आधारित)

धन्यवाद, उल्हास हरी जोशी

California IVF Fertility Center
In Collaboration with UC Davis Health System
Offices in Sacramento and Davis
Fertility Testing and Treatment
IVF, ICSI, and Inseminations
Tubal Reversal Surgery
Vasectomy Reversal
Genetic Testing of Embryos
PGD/PGS
Family Balancing (Boy or Girl)
Egg Donation Program
Donated Embryos
(530) 771-0177
www.CaliforniaIVF.com

लेख: स्मृती   लेखक - अरविंद साने

माणसाचे उतारवय सुरू झाले की त्याला भरपूर मोकळा वेळ मिळतो. डोक्याला दुसरी काही चिंता नसली की नकळत तो त्याच्या गत आयुष्यात हिंडायला सुरूवात करतो. आठवणींना उजाळा मिळतो. अनेक प्रसंग, चर्चा, घटना त्याला ताजेपणाने पुन्हां अनुभवायला मिळतात. तरुणपणात त्याला वर्तमानापेक्षा दुसरे काही सुचतच नाही. नित्य नवीन घडत असते. त्या घटनांना सामोरे जाणे एव्हढेच त्याला करता येते. पण एकदा का तो कामाच्या व्यापातून मोकळा झाला किंवा त्याचे वय झाले म्हणजे त्याचा पूर्वस्मुतींचा मेंदूतील कप्पा धाडकन उघडतो. अनेक गोष्टींचे विचारचक्र सुरू होते.

एक प्रकारे ही अवस्था म्हणजे त्याच्या उलटून गेलेल्या आयुष्याच्या पानांचे वाचन असते. एकूण गतजीवनाचा तो आढावा घेत असतो. हे सर्व आठवत असताना त्या सर्व घटना जणू काही आताच घडत आहेत असा त्याला भास होतो. एका अर्थाने पुनःप्रत्ययाचा आनंद तो अनुभवत असतो.त्यातील काही काही प्रसंग त्याला परत परत आठवून अनुभवावे असे वाटत असते. तर काही घटना आठवायला नको असे वाटूनही त्या त्याच्या भोवती भुंग्याप्रमाणे घोटाळत राहतात. इच्छा नसतानाही त्याचा पिच्छा सोडीत नाहीत. तरीसुध्दा या आठवणींचे जागेपण त्याला हवे हवेसे वाटते हे मात्र खरेच.

या आठवणीं मध्यें प्रामुख्याने त्याच्या आयुष्यांत येऊन गेलेल्या अनेक व्यक्तींची पुन्हां एकदा गांठ पडते. त्या माणसांच्या सहवासात लाभलेले सुख तो परत अनुभवतो. त्यावेळचे काही माणसांशी आलेले कटू प्रसंग त्याला आठवतात. त्या त्या व्यक्तींच्या सोबतीने झालेले आयुष्यातील बदल त्याला स्पष्ट जाणवतात. या आठवणी इतक्या ताजेपणाने बाहेर येतात की त्यावेळचा सगळा संवाद त्याला आठवतो. काळाच्या पडद्याआड गेलेली माणसे त्याला पुन्हां भेटतात. स्वतःच्या वयोमानामुळे त्याला वाटते, जर मृत्यु नंतरचे विश्व अस्तित्वात असेल तर ही सगळी माणसे मला पन्हां भेटतील. त्या सर्वांना साद घालून तो म्हणतो, 'थोडा अवधी आहे, आपण परत भेटणार आहोत.'

माणसाच्या बालपणात किंवा शिक्षणाच्या काळात तर त्याच्या सहवासात येणारी मित्रमंडळी सतत बदलत असतात. एकाद्या दुसऱ्या इयत्तेत एकादा मित्र त्याचा जिवश्च कंठश्च दोस्त होऊन जातो. आता त्याच्या सहवासाशिवाय आपण जगूच शकणार नाही असे त्याला वाटत असते. पण वर्ष संपते, तो मित्र किंवा मैत्रिण दुसऱ्या वर्गात जातो, शाळा सोडून जातो, तो किंवा तुम्ही गाव बदलून जाता अन् मग त्याची आठवणही राहात नाही. अशा सर्व व्यक्ती या आयुष्याच्या संध्याकाळी तुमच्या विचारांच्या आकाशात ताऱ्याप्रमाणे चमचम करताना दिसतात. माझ्या दुसरीच्या वर्गातील एका मित्राला दुसऱ्या वर्गात घातला म्हणून मी खूप थयथयाट केला होता. शाळेने आम्हा दोघांना परत एका वर्गात घातले तेव्हां कोठे मी शाळेत परत जाऊ लागलो. पण चवथ्या इयत्ते नंतर तो कोठे गेला हे मी पार विसरून गेलो. आता मला त्याची खूप आठवण येते. पण प्रयत्न करूनही त्याचा ठावठिकाणा मला मिळत नाही याचे वाईट मात्र जरूर वाटते. कॉलेजमधील आम्ही एक दोघे मित्र रोज एकमेकांच्या घरी जात असू. सकाळी गप्पा झाल्या तरी रात्री गप्पामध्यें मध्यरात्र उलटून गेलेली समजत नसे. पण एकदा कॉलेज संपून आपआपल्या कामात गुंतल्यावर त्यांची उणीव वाटेनाशी झाली. पण आता मात्र ते कोठे असतील, काय करत असतील त्यांचे कुटुंब कसे असेल याची उत्सुकता मन बेचैन करते.

सोडून गेलेल्या आप्तेष्टांच्या आठवणी अशाच मनाला सतावतात. त्यांनी आपल्याला दिलेली शिकवण, मनावर केलेले संस्कार आठवले की, आपण जे घडलो, जे आत्ता आहोत ते त्यांच्यामुळेच याची प्रकर्षाने जाणीव होते. आणि मग वाटते, 'अरेच्या! ते हयात असताना आपण त्याबद्यल त्याना कृतज्ञता सुध्दा व्यक्त केली नाही.' याचे फार वाईट वाटत राहते. शाळा कॉलेजमधील शिक्षकानी केलेले प्रेम, दिलेले शिक्षण, केलेले कौतुक आठवले की त्यांच्या स्मृतींनी त्यांच्या बद्यलची आदरभावना अधिकच तीव्र होते. या उतारवयात आपल्या मुलांकडून आपल्या अपेक्षा असतात. कित्त्येक गोष्टींसाठी आपण त्याना गृहीत धरतो. पण अशावेळी मला माझ्या आई वडिलांची आठवण येते. मन कासाविस होते, मनात विचार येतो, आपल्याही आई वडिलांनी आपल्या कडून अशाच अपेक्षा

केल्या असणार. त्यांच्या अपेक्षांना आपण पुरे पडलो नसणार. त्यांना हवा होता तेवढा वेळ आपण त्यांना दिला नाही. त्यांना बरे वाटेल अशा गप्पा आपण त्यांच्याशी केल्या नाहीत. त्यांच्या कुशीत शिरून आपण मन कधी मोकळे केले नाही. त्यांनी घेतलेल्या कष्टांसाठी आपण तोंडाने बोलून कधी कृतज्ञता व्यक्त केली नाही. त्यांचे दुःख समजावून घेऊन त्यांना कधी मानसिक बळ दिले नाही. आपले फार चुकले. पण आता काय फायदा? सकाळी उठून त्यांच्या फोटोला नमस्कार करून त्यांची माफी मागण्या शिवाय आपण काहीही करू शकत नाही. त्यांचा आशीर्वाद मागणे म्हणजे केवळ अप्पलपोटेपणा ठरेल. मला एक लहान बहीण होती. ती तिच्या सहाव्या वर्षीच आम्हाला सोडून गेली. तिची पुसटशी आठवण मनांत पक्की राहीली आहे. आज ती असती तर किती मायेने तिने 'भाऊ' म्हणून हाक मारली असती. मी पण मोठया हक्काच्या प्रेमाने तिला माझ्याकडे बोलावून घेतले असते. हे बहिणीच्या नात्यातले सुख आयुष्यभर न मिळू शकल्याने दुः ख्खी होतो. काही तरी कमी असल्याची रुखरुख सतत लागून राहिली आहे. त्यातूनही मला दोनही मुलगे. म्हणजे मुलीचा प्रेमळपणा, हळुवार स्पर्श लाभला नाही. परंतु या दोन्ही उणिवा माझ्या सुनांनी भरून काढल्या. दोघींनीही अफाट प्रेम दिले. माया करतात आणि आपुलकीने माझी काळजी घेतात.

पूर्वायुष्यात माणसाने अनेक प्रकारे आनंद अनभुवलेला असतो. अनेक कलाकारांच्या कार्यक्रमातून त्याला परमानंद, विरंगुळा मिळालेला असतो. संगीत मैफिलीतून त्याला गाण्याचा आनंद मिळतो, धुंद करणाऱ्या अनेक वाद्य वादनातून त्याला हारवून जाणे झालेले असते, वेगवेगळी नाटके किंवा सिनेमे पाहून तो कोठेतरी आपले जगणे तुलनात्मक दृष्टीने पाहात असतो. त्यातील पात्रांच्या मध्यें तो स्वतःला शोधित असतो. काव्यानुभवातून तो जगण्याचे, निसर्गाचे, नात्याचे गणित उलगडत असतो. हा सगळा आनंद घेत असताना मला हे शिकायला हवे होते, ते सादरीकरणाचा आनंद मिळवायला हवा होता, असे वाटते. बरेच काही करण्याचे राहून गेले याची खंत मनाला पोखरून टाकते. सामाजिक कार्य करणाऱ्या डॉ. बाबा आमटे यांची आठवण झाली की अरे आपण दुसऱ्यासाठी काहीच केले नाही. याची फार रुखरुख लागते. भोवतालचे समाजाचे देणे आपण दिले नाही याची टोचणी लागते. आणि मग खरंच पुढचा जन्म असेलच तर तशी एकादी कला आत्मसात करायचीच की ज्यामुळे आपण इतरांना आनंद देऊ शकू असे मनाला मी बजावतो. अशी सामाजिक सेवा हातून घडावी अन् त्यासाठी एक जन्म मिळावा असे मनापासून वाटते.

आयुष्यात आपण खूप वेळा घेतलेले चुकीचे निर्णय या आठवणीच्या गर्दीत नक्की आठवतात. ज्या चुका हातून घडतात त्या घडत असताना आपल्या ध्यानांत येत नाहीत पण आठवणींच्या या प्रवासात आपल्याला त्याची समज येते. त्या वेळी आपल्याला वाटते पुन्हां एकदा ते आयुष्य मिळाले आणि तशी परिस्थिती निर्माण झाली तर त्या चुका टाळण्याचा, सुधारण्याचा मी अगदी मनोभावे प्रयत्न करीन. अशी संधी मिळण्यासाठी तरी पुन्हां एकदा जन्म मिळावा.

स्मृतींच्या या भेंडोळयात आयुष्यात मिळालेले यश आठवते. सुखाचे प्रसंग आठवतात. त्या आठवणी परत एकदा सुख देतात. ज्यांच्यामुळे हे सुख, यश प्राप्त झाले त्यांना शतशः मी धन्यवाद देतो. आयुष्यात अनेक प्रवास झालेले असतात, अनेक स्थळांना भेटी दिलेल्या असतात. त्या सर्व प्रवासाची, स्थळांची तिथल्या घरांची, बाजाराची, रस्त्यांची उजळणी मोठा आनंद देते. मग रिकाम्या वेळी पुन्हां एकदा त्या स्थळांना मनातून भेटी देऊन येतो. त्या रस्त्यातून फेर फटका मारतो, बाजार हिंडतो, माणसांशी गप्पा मारतो. माझ्या आयुष्यात भारतातील अनेक राज्ये, शहरे, गावे पाहिली. तसेच युगांडा, मॉरिशस, सेशल्स, इजिप्त, युरोप, आणि अमेरिका अशा खूप ठिकाणी राहणे झाले, भटकंती झाली त्या सर्वाना पुनर्भेटीचे सुख या आठवणी मला देतात. वेगवेगळया वयात वेगवगळया चवीने जिभेचे चोचले पुरविले गेले आहेत. त्या सर्वांच्या आठवणीने जिभेला पाणी सुटते. जिभेवरची चव अजूनही गेलेली नाही. आईच्या हातचे अनेक पदार्थ नुसते आठवले तरी पोट भरते. जिभेला आणि नाकाला सुख मिळते.

या वयातील आठवणींची आणखी एक गंमत आहे. वयोमानाने तशी स्मृती पूर्वीइतकी तल्लख राहात नाही. वर्त मानातील अनेक गोष्टी पटकन आठवत नाहीत माणसांची नांवे, फोन नंबर्स, लक्षांत राहात नाहीत. इतकेच नाही तर बाहेर पडले की कशासाठी आपण बाहेर पडलो हेच आठवत नाही. चार वस्तू आणायला म्हणून बाहेर पडावे

तर दुकानात गेल्यावर दोन गोष्टी आठवतात आणि दोन गोष्टी आठवतच नाहीत. घरात आठवणीने म्हणून एकादी वस्तू ठेवलेली असेल तर ज्या वेळी ती लागेल त्या वेळी ती जाम आठवत नाही. आवडत्या गाण्याचे टयूनस आठवतात पण गाण्याचे शब्द मात्र काही केल्या आठवत नाहीत. कित्येकदा आपण काल काय केले हे सुध्दा नीटपणे सांगता येत नाही. किल्ल्या, फोन, पेन, डायरी ह्या तर नेहमी हरवण्याच्या वस्तू. याउलट पूर्वी घडलेल्या घटना, संवाद, हे मात्र बिनचुक आठवत असते. अगदी तारीख, वार, वेळ यासहीत.

या स्मृती विश्वाने एक मात्र जाणीव होते. आयुष्य पूर्णपणे उपभोगल्याचे समाधान मिळते मन तृप्त होऊन जाते. शेवटच्या प्रवासाला मन पूर्ण तयार होऊन गेले आहे. आणि हो!! राहून गेलेल्या गोष्टी करण्यासाठी, या आयुष्यात केलेल्या चुका सुधारण्यासाठी पुन्हां एकदा जन्म घेण्यास मन आसुसलेले बनले आहे.हा मोठा फायदा नाही का?

याच वेळी शोभा बेंद्रे यांच्या 'पानगळ' या पुस्तकाची मला प्रकर्षाने आठवण झाल्या शिवाय राहात नाही. त्यांनी 'अल्झायमर' विषयी लिहिताना म्हटले आहे, माणसाने कितीही गर्वाने म्हटले की उतारवयांत मला काहीही करता आले नाही तरी चालेल. मी माझ्या आयुष्यातील आठवणींच्या साथीने आनंदात जगू शकेन. पण जर अल्झायमर सारखा असाध्य रोग नशिबात आला तर तुम्हाला आठवणीच राहाणार नाहीत. त्यावेळी हे जगणे असह्य होईल. म्हणून आठवणींचे हे मऊ, उबदार पांघरूण या वयांत आवश्यक आहे. तसे ते राहू दे हीच प्रामाणिक इच्छा.

धन्यवाद अरविंद साने (मोनिका साने यांचे सासरे)

KS KULKARNI LEGAL SERVICES
Estate Planning ■ Employment Law ■ HR Consulting
Eliminate Uncertainties
Estate plans assure that your wishes regarding health care, property distribution and final arrangements are honored, with:
• Wills and trusts
• Advance health care directives
• Durable power of attorney
• Guardianship for minors
Deepa A. Kulkarni, Attorney at Law
CA Bar License #287097
Davis
510 Fourth St.
www.kulkarnilegalservices.com
(530) 302-5602
Sacramento
555 University Ave., Suite 290

WISH MY TRIP
Get Pack Go..
For lower Air Fares on Int'l Air Tickets
Bhavin (Bobby) Shah
510 400 TRIP (8747)
510 400 7784 (Fax)
www.WishMyTrip.com
Reservations@WishMyTrip.com
www.facebook.com/WishMyTrip
Like
Accredited by
IATAN
CST # 2117495-40

BMM 2017 अधिवेशन - आपलं अधिवेशन,

अनघा हुपरीकर यांना हा flyer पाठवल्याबद्दल धन्यवाद, तसेच BMM २०१७ च्या सर्व कमिटीला शुभेच्छा, मिशिगन येथे पुढील जुलैमध्ये भेटूच,

कविता: आहे का तुझी तयारी?

कवि: अजित नातू

(आजूबाजूला काही माणसे अल्पसंतुष्ट वृत्तीने झाले तेव्हढे खूप झाले, आता कशाला उगाच जास्त त्रास करून घेऊ, किंवा काहीजण सारखी दुसऱ्यांना किंवा परिस्थितीला दोष देत बसतात पण मार्ग काढून प्रगती करणे, त्यासाठी धडपड, प्रयत्न करतच नाहीत तर काही दुसर्यांनी केलेली धडपड, स्वतः बांधावर बसून फक्त पाय खेचतात किंवा पाठीमागे gossip करून खोटेनाटे पसरवतात. विहिरीतील बेडकांची हि वृत्ती असते त्यावरून कुपमंडूक (कूप म्हणजे विहीर, मंडूक म्हणजे बेडूक) शब्द योग्य वापरात आला. या अशा लोकांनी वरील वृत्ती टाळून प्रयत्न करून रहाटगाडग्यातून बाहेर यावे असे वाटते. अशा लोकांचे स्वभाव दर्शन बघून अजितला सुचलेले हे काव्य.)

आहे का तुझी तयारी?
============

विहिरीत यश प्राप्त करणारे तूम्ही मंडूकि
थोडे श्रम, जरा मान उंच करून बघूया कि

सात समुद्राला पार करणे तर जाउंदे कि
बाहेरील एका लाटेवर तरी आरूढ व्हा कि

अहो निदान तशी थोडी स्वप्ने तरी बघा कि
तेच रहाटगाडगे कवटाळाल तरी दिवस किती

विहिरीतून चंद्र दिसतो 'फक्त', नाही लागतो हाती
पकडायचे जर तेज सूर्याचे, तर बाहेर तरी पडकी

(उर्वरित भाग पुढील पानावर)

डबक्यातल्या बेडकांवर वरचढ हि नाही यशाची सिद्धी
बाहेरील खारीचे प्रयत्नच सेतू बांधतात, हे जाण कि

काय म्हणतोस, त्या गोतावळ्यातून बाहेर कसा येऊ कि
अरे, आहे त्या रहाटगाडग्यात हो स्वार अन बाहेर उडी घे कि

होय, खरचटेल कदाच तोडताना हे आत्मसंतुष्ट वर्तुळ कि
अरे मानवा, नवा जन्म देताना आईसुद्धा रक्ताळतेच कि

इतिहासातले सूर्य बसल्या जागी नाही अवचित उगवले कि
(जग)रहाट तोडण्याचे, स्वप्न बघण्याचे धाडस त्यांनी केले कि

इतिहास घडतो कैंव्हा, जेंव्हा होते विहिरीची वाहती नदी कि
प्रश्न असा बेडका, तुझ्यात तशी आकांक्षा,, अस्मिता आहे का नाही!

धन्यवाद, अजित नातू!

mithai4all
Your Shop Away From Home
Celebrate Diwali with Mithai4all
Send mithai gifts to your
parents, friends & relatives in India.
Order mithai online & get it home delivered
We also deliver to US, UK, Canada,
Singapore, Australia and 10+ countries

नेहेमीची सदरे - हे करून बघा, हे माहित आहे का, सुविचार, चुटका

- हे करून बघा:
  - थोडा कापूर आणि खोबरेल तेल यांचे मिश्रण खाज येते तिथे चोळले तर खाज कमी व्हायला मदत होते!
- हे माहित आहे?
  - हत्ती दिवसाला २१० लिटर पाणी पितो. बापरे! हत्ती पाळणे म्हणजे दुष्काळात तेरावा महिना!
  - हत्तीची सोंड १४० किलो वजनापर्यंत असू शकते. हे म्हणजे २-३ माणसे एकत्र झाली तर फक्त सोंडे एव्हढे वजन होईल! गम्मत म्हणजे त्यात एकही हाड नसते. हत्तीमध्ये 'तुझ्या सोंडेला काही हाड आहे कि नाही' असे म्हणत असतील.
  - कित्येक सिनेमामध्ये ट्रेन किंवा मोटरला घोड्यावरून पाठलाग करून सिनेमाचा हिरो दुष्टाला पकडून आपल्या प्रेयसीला सोडवतो असे सर्रास दाखवतात. पण घोड्याचा सरासरी धावण्याचा veg ४४ किलोमीटर असतो. आता बोला!
  - असे म्हणतात कि बोटाचे ठसे जसे प्रत्येकाचे वेगळे असतात तसेच म्हणे जिभेचे ठसेपण दोघांचे सारखे नसतात. अरे पण, कशावरून? कोणी हे पारखून पहिले अन कसे? विचार करा, तुमच्या जिभेला ती काळी शाई लावून जिभेचा ठसा घ्यायला सांगितले तर? तुमचे माहित नाही पण माझा 'ठसा' नाही उमटला तरी चालेल बुवा!
- सुविचार:
  - टेकडीवर उंच चढताना वाटेतल्या दगडांचा आधार मिळतो. म्हणूनच वर तुम्ही चढू शकता. पण उत्तुंग पोहोचल्यावर ते दगड लक्षात तरी रहातात का? अरे माणसा, प्रगती कर, नक्कीच कर पण पायरयाना विसरू नको. त्यामुळे प्रगतीची 'उंची' कळते! (अजित नातू)
- खरच विचार करा:
  - माणूस देवळे बांधायच्या मागे लागला आहे. कित्येक पंथ त्यांचे मंदिर किती भव्य, अलिशान, श्रीमंती थाटाचे याची चढाओढ करत असतात. पण असे पंथ, अशी माणसे, माणसातील देवाला विसरतात. ठोकला नमस्कार कि झाले काम पण देवाचे खरे काम दुसऱ्याला भावपूर्ण प्रेमाने आपले करणे, सचोटीने वागणे हे आहे ते विसरतात. देवळाच्या आधी, माणसाला बांधा! पण आजूबाजूला बघा, अशी बरीच मंडळी दुर्दैवाने पुष्कळ दिसतील (अजित नातू).

- माहिती कि प्रत्यक्ष अनुभव:
  - "How are you",'राम', 'नमस्कार' असे शब्द सगळ्यात जास्त बोलले जातात. पण ते खरे नाही. सगळ्यात जास्त बोलले जाते ते म्हणजे "अहो जरा ऐकलत का' (-:!
- हे माहित आहे का?
  - सर्वसाधारणपणे ११% टक्के लोक डावरे असतात!
  - मध हा एकच नैसर्गिक पदार्थ आहे जो कधीच नासत नाही, बिघडत नाही!
  - टेलिफोन डिरेक्टरी पहिल्यांदा १८७८ मध्ये प्रकाशित झाली बरका! त्यात एकुण ५० नावे होती!
- कमाल कि नाही!
  - Fortune cookie फक्त चायनीज हॉटेलमध्ये आढळते. साहजिकच आहे कि अशी पद्धत चीन मध्ये सुरु झाली हे वाटले तर नवल नाही. पण गम्मत म्हणजे अशी भविष्य सांगणारी Fortune cookie San Francisco मध्ये पहिल्यांदा सुरु झाली बरका!
  - आणि तसेच छोट्या मुलांचे आवडते ‘french fries” चक्क बेल्जियममध्ये पहिल्यांदा बनवले गेले!
- गम्मत:
  - मुलगी: माझ वय अठरा वर्ष आहे, माझा रंग छान गोरा आहे, त्वचा मुलायम व नाजूक आहे तर मी रात्री आणखीन काय लावून झोपू?
  - सल्ला: दाराची कडी! (:-
- वाचनात आले:
  - मराठीला जी ‘मज्जासंस्था’, त्याला इंग्रजीत ‘नर्व्हस सिस्टीम’ म्हणतात. दृष्टिकोनातला फरक दुसरे काय! (पुलकित)
  - Forgiveness does not change the past, but it does enlarge the future!

Reliance
SuperMart

Reliance SuperMart - The Fresh Choice in Quality Produce

Reliance SuperMart selects Fresh Quality Produce from Selected Local Growers. Our Customers want the Best for their Families and We Deliver!

Reliance SuperMart brings Folsom Community High Quality Fresh Produce and other Healthy Products.

This is the place do your Indian grocery shopping if you live in Folsom or nearby areas.

Store location is 297 Iron Point Road, Folsom, Ca 95630 and website address is www.reliancesupermart.com.

शब्दकोडे

१.	२.			■	३.	४.	५.
६.		■	■	७.			
	■	८.				■	
९.			■		■	१०.	
	■	११.	१२.				■
■	१३.			■	■	१४.	१५.
१६.			■	१७.	१८.		
१९.		■	२०.				■

आडवे शब्द:

१. गणपतीचे एक नाव, वेडेवाकडे तोंड असलेला
३. उत्पन्न, मिळकत
६. एक मादक पेय
७. गलथान, बावळट

८. चांगली वागणूक असणारा
९. वैद्य
१०. भांडं किंवा लायक
११. कोणतीही गोष्ट जपून, कमी प्रमाणात वापरणे
१३. एकत्र, संलग्न होणे, मिसळून जाणे

१४. करुणा, अनुकंपा
१६. थोर

१७. श्रीकृष्णाचे चक्र
१९. असे असल्यास ह्या अर्थाचे उभयान्वयी अव्यय किंवा होडी, मचवा
२०. कापरे भरेल असे, रोमांचकारी

उभे शब्द:

१. वर देण्यासाठी उचललेला हात, कृपा
२. प्रगती, नियम, परंपरा, पध्दत
३. रोग झालेला, बरं वाटत नसणारा
४. स्नेहभाव, कृपादृष्टी किंवा मनोरंजनाचा, नाट्याचा एक प्रकार
५. बाहुली चालविण्याची दोरी
७. एकदम, अकल्पितपणे
८. एकाच वेळी अस्तित्वात असलेले
१०. प्रकाश पलिकडे जाऊ देणारा
१२. वजनाचे एक माप, विशेषतः जड वस्तूचे वजन करण्यासाठी हे माप वापरतात
१३. सुखसंचार
१५. एक प्रकारचे वाहन, विशेषतः अवकाशप्रवासासाठी वापरले जाणारे
१६. अभिप्राय, विचार, मान्यता
१७. मोठी सुरी किंवा मद्य

१८. किंमत किंवा प्रत्येक

Links to 2016 event photos

Rangapanchami Photos :
https://goo.gl/photos/DjWQNCSQc7kjiy9K8
https://goo.gl/photos/3kTommwLJac81n1H8

Gudhipadwa & Maharashtra Din Photos :
https://goo.gl/photos/op9CPN2epquqnXCx6
https://goo.gl/photos/w92byuhSodgyLnhd8

Maitra Jeevanche Photos :
https://goo.gl/photos/P4HfXUXeuWTEZJxU7
https://goo.gl/photos/B4mNP6wW7tKiHMhPA

Picnic Photos :
https://goo.gl/photos/vEJMRfS43xC9ZRJC9
https://goo.gl/photos/Roxo3XZNtW3cGw6L8

Ganapati photos :

https://goo.gl/photos/cALT9t8euk1XdumE9

https://goo.gl/photos/67Xorut6udNkGW7K8

KKG natak photos:

https://goo.gl/photos/obHCGsJCBTuqDkNY7

https://goo.gl/photos/sQkCw73et5jcEceg7

Dr. vikas Amte felicitation photos:

https://goo.gl/photos/VqYRXejrzMi2fUAV6

Kojagiri photos:

https://goo.gl/photos/WfbaRRYFoG8DpQWc9

Diwali 2016 Photos:
https://goo.gl/photos/PGTMF2Bd4cZcwLnx8

https://goo.gl/photos/D6MpZ9bwn7tJckmT9
https://goo.gl/photos/EEWiUNzPz7Y7CU8o6
https://goo.gl/photos/BiAbjyvQvSJPHs7a9

March for the Dream

Indian Association of Sacramento (IAS), for which mmsac is a supporting organization, is participating in "***March for the Dream***" honoring Martin Luther King Jr. on January 16, 2017 to showcase our Indians in local community activities and make us part of the mainstream society in Greater Sacramento area in specific and US in general. I appeal to our Marathi friends to participate in the parade as our local social interest.